**सुविचार**

निघून गेलेला क्षण कधीच परत आणता येत नाही.


# दैनिक आपला विदर्भ



apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034





आता स्विगीमधून कमाई करणार माधुरी दीक्षित

आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 48 ■ मंगळवार, दि. 24 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# अखेर महावितरण लागली कामाला; आपला विदर्भाचा दणका

## नागरिकांकडून दैनिक आपला विदर्भावर कौतुकाचा वर्षाव



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरातील कऱ्हाळवाडी फाटा येथील रोहित हे गेल्या अनेक महिन्यापासून नादुरुस्त होते.सदर रोहित दुरुस्त करण्यासाठी वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही महावितरणकडून याकडे दुर्लक्ष केले जात होते.

याबाबत दैनिक आपला विदर्भ मध्ये दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणचा शेतकर्यांचा जिवाशी खेळ या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून परिसरातील नागरिकांच्या समस्येला वाचा फोडली होती. या वृत्ताची दखल घेत महावितरण कंपनीचे अधिकारी खडबळून जागे होत २३ सप्टेंबरपासून सदर रोहित्र दुरुस्तीच्या कामाला लागले आहेत.

डोणगाव परिसरातील कऱ्हाळवाडी फाटा येथील रोहित्र गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त होते. सदर रोहित दुरुस्त करण्याबाबत वारंवार मागणी करूनही डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीच्या वतीने दुर्लक्ष केले जात होते. या नादुरुस्त रोहित्रामुळे एखाद्या वेळेस अपघात घडण्याची भीती निर्माण झाली होती. तर, या नादुरुस्त रोहीत्रामुळे परिसरातील नागरिकांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत होता.याबाबत दैनिक आपला विदर्भ मध्ये दि.२१ सप्टेंबर रोजी वृत्त प्रकाशित होताच विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचरी खडबडून जागे होत कव्हाळवाडी फाटा येथील नादुरुस्त रोहित्र दुरुस्त करण्यास प्रारंभ केला आहे. दैनिक आपला विदर्भ मध्ये वृत्त प्रकाशित करून गोरगरिबांच्या समस्येला वाचा फोडल्याबद्दल व सदर समस्या निकाली काढल्याबद्दल दैनिक आपला विदर्भचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.



### महावितरणचा शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ

■ वारंवार मागणी करू नही दुरुस्तीकडे दुर्लक्ष

■ अनुचित प्रकार घडल्यास सहाय्यक अभियंत राहणार जबाबदार

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याचा जीव टांगणीला लागला असून अनेक शेतकरी त्रस्त झाले आहेत.डोणगाव परिसरातील कव्हाळवाडी फाटा येथील रोहित हे गेल्या अनेक महिन्यापासून नादुरुस्त आहे.सदर रोहित दुरुस्त करण्यासाठी वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही महावितरणचे सहाय्यक अभियंता यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. या नादुरुस्त रोहित्रा मुळे मात्र अनुचित प्रकार घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या अनुचित प्रकाराला मात्र महावितरणचे सहाय्यक अभियंता जबाबदार राहणार आहेत.

डोणगाव येथील धोंडू रामकृष्ण बाजड यांनी डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कव्हाळवाडी फाटा येथील रोहित्र गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त आहे. सदर रोहित दुरुस्त करण्यासाठी विद्युत वितरण कंपनीकडे वारंवार मागणी करण्यात आली आहे. मात्र या मागणीकडे विद्युत वितरण कंपनीने दुर्लक्ष केले आहे. या नादुरुस्त रोहित्रामुळे एखाद्या वेळेस अपघात घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या ठिकाणी असलेल्या रोहीत्रामुळे परिसरातील नागरिकांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तरी विद्युत वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन सदर कव्हाळवाडी फाटा येथील नादुरुस्त रोहित्र तात्काळ दुरुस्त करून द्यावे, अन्यथा डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल.वेळप्रसंगी परिसरातील नागरिकांना सोबत घेत कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशाराही विद्युत वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.




# मंत्रालयातील 'मुख्यमंत्री वॉर रूम' चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील नूतनीकरण केलेल्या ' मुख्यमंत्री वॉर रूम' आणि म्युरल (भित्तीचित्र) चे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रिमोटची कळ दाबून आज करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, आदी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी वॉर रूममधील सोयी सुविधांची माहिती घेतली.



राज्यातील प्रकल्पांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डॅशबोर्ड, प्रकल्पाची फाईलची सद्यस्थिती, ज्या विभागाकडे प्रलंबित आहे, त्या विभागाला जाणारी नोटिफिकेशन आदींबाबत माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी घेतली. या सर्व पद्धतीमुळे प्रकल्पाला गती मिळून विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर नियंत्रण ठेवून सातत्याने पाठपुरावा 'मुख्यमंत्री वॉर रूम' करीत असते. नवीन वॉर रूम अत्यंत प्रशस्त असून आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहे.

वॉर रूमची वैशिष्ट्ये :-

* राज्यातील १५ क्षेत्रातील विविध ७४ प्रकल्पांच्या विविध टप्प्यांवरील कामाचा आढावा.
* प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा, निधी देणारी यंत्रणा यांच्यामधे समन्वय.

>> पान २




## चाईल्ड पॉर्नोग्राफी पाहिल्यास पाच वर्षांचा सश्रम तुरुंगवास! सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा निकाल

नवी दिल्ली : 'चाईल्ड पोर्नोग्राफी' डाऊनलोड करणे आणि बघणे पॉक्सो कायदा आणि आयटी कायद्याअंतर्गत गुन्हा असल्याचा निकाल सोमवारी सकाळी सर्वोच्च न्यायाल्याने दिला. मद्रास उच्च न्यायालयाचा निकाल फेटाळून लावत, सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. चाईल्ड पोर्नोग्राफी, यातून अल्पवयीन मुलांचं होणारे शोषण, त्याचा त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम, पीडीत मुला मुलींना न्याय

>> पान २

# मविआत घराणेशाहीला काँग्रेसकडून विरोध

## आर्वी विधानसभेत खासदाराच्या पत्नी तुतारी चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात?

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत वर्धा लोकसभा मतदारसंघ चर्चेत राहिला तो काँग्रेसच्या अमर काळे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी चिन्हावर निवडणूक लढल्याम ुळे. पण आता पुन्हा एकदा वर्धयात काँग्रेसच्या हक्काच्या असलेल्या आर्वी विधानसभा क्षेत्रात खासदार अमर काळे यांनी त्यांच्या पत्नी मयुरा काळे यांना विधानसभेच्या रिंगणात उतरविण्याचा डाव आखला आहे. त्यासाठीची मोर्चेबांधणीही मतदारसंघात सुरू असल्याची चर्चा आहे.

असे असले तरी एकाच घरात दोन्ही उमेदवारी देण्याला आता काँग्रेसकडून विरोध व्हायला लागला आहे. पती खासदार तर पत्नी आमदार अशा घराणेशाहीच्या राजकारणाला काँग्रेस नेते शैलेश अग्रवाल यांनी विरोध केला आहे. आर्वी विधानसभा क्षेत्रात सामान्य माणसाशी नाळ जुडवून असलेले अनेक नेते असताना येथील जागा ही काँग्रेसला सुटावी, अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आहे.

आर्वी विधानसभेत खासदाराच्या पत्नी तुतारी चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात?



महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली असून आता विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. अशातच आगामी विधानसभेची अद्याप घोषणा झालेली नसली तरी, आगामी विधानसभेसाठी सर्व पक्षांनी आपली कंबर कसली असून राजकीयदृष्ट्या सर्वांगाने जुळवाजुळव सुरू केली आहे. अशातच यंदाची राज्यातील विधानसभेची निवडणूक चुरशीची होणार आहे.

# महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मग देवेंद्र फडणवीसांवर टीका का?

## नरेंद्र पाटलांचा मनोज जरांगेंना सवाल

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** राज्यात महायुतीचे सरकार असून प्रमुख म्हणून मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आहेत असे असताना देवेंद्र फडणवीस यांच्यावर मनोज जरांगे पाटील यांची टीका का? असा सवाल करीत त्यांना कोणीतरी मार्गदर्शन करीत आहे. ते आता मराठा समाजाचे नेते म्हणून काम करीत असताना त्यांना आता याचे ज्ञान मिळाले पाहिजे, अशी टीका अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्याकडून काही दिवसापासून सातत्याने भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांना लक्ष करण्यात येत असताना राज्याचे प्रमुख एकनाथ शिंदे किंवा शिंदे गटाचे कोणताही मंत्री याविरोधात बोलताना दिसत नाही. यामुळे भाजपमध्ये मोठी अस्वस्थता आहे. याला तोंड फोडायचे काम नरेंद्र पाटील यांनी केले आहे. यापूर्वी जरांगे पाटील यांनी फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेवर भाजपकडून निलेश राणे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड या नेत्यांनी आवाज उठवत जरांगेंना उत्तर दिले होते. मात्र, यापैकी एकानेही राज्याचा व महायुतीचे प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना उपमुख्यमंत्री असणाऱ्या देवेंद्र फडणवीसांवर टीका का? असा सवाल केला नव्हता. नरेंद्र पाटील यांनी मात्र याबाबत थेट सवाल केला आहे.



लोकसभा निवडणुकीतही जरांगे यांच्या भूमिकेचा सर्वात जास्त फटका भाजप व अजित पवार गटाला बसला. मात्र, त्या तुलनेने एकनाथ शिंदे यांच्या चांगल्या जागा निवडून आल्या. अगदी मराठवाड्यातही संभाजीनगरची जागा शिंदे गटाने जिंकत जरांगे यांचा आपल्या पक्षाला फटका नाही याची जाणीव ठेवली आहे. यातूनच आता जरांगे यांच्यासोबत चर्चेला जातानाही भाजपचे नेते बंद करून केवळ शिंदे गटाचे मंत्री जाताना दिसत आहेत. नरेंद्र पाटील यांच्या वक्तव्यातून भाजप व शिंदे गटात जरांगे यांच्याकडून फडणवीस यांच्यावर सातत्याने केल्या जाणाऱ्या एकतर्फी टिकेवरून सर्व काही आलबेल नसल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्र्यांच्या वारंवार सांगण्यानंतरही जरांगे उपोषणाला बसतात. आता त्यांची प्रकृती थोडी खराब झाली. त्यामुळे काही जिल्ह्यामध्ये वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न सुरु आहे. शंभूराज देसाई यांना काही मंडळी भेटले असून लवकरच मुख्यमंर्त्यानाही ही मंडळी भेटतील आणि मुख्यमंत्री यातून चांगला मार्ग काढतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. लोकसभा पराभवाचे आत्मचिंतन झालेले आहे. काही प्रमाणात कुणबी प्रमाणपत्र व आरक्षण देऊन पण जाणीवपूर्वक महायुतीच्या विरोधात काम करण्यात आले. तुमचे काहीच प्रश्न सोडवले नसते तर बरोबर होते. मात्र,



प्रश्न सोडवून देखील तुम्ही टीका करणार, तुम्ही विरोधात काम करणार आणि तुम्ही महायुतीचे खासदार पाडण्याचे काम केले हे चुकीचे आहे. पण, येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी सगळे जण सक्षम आहेत, असेही नरेंद्र पाटील यांनी म्हटले.

### देवेंद्र फडणवीसांवर जाणीवपूर्वक टीका

यापूर्वी असंख्य आंदोलने झाली आणि आंदोलनकर्ते आपण पाहिले आहेत. मात्र, प्रत्येकवेळी आपल्या मागण्या कमी जास्त करीत असताना जाणीवपूर्वक देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली जात असल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांना शेवटची संधी असल्याच्या जरांगे यांच्या वक्तव्यावरही त्यांनी सडकून टीका केली आहे. राजकारणात कोणी कोणासाठी शेवटचा दिवस सांगू शकत नसतो, असे सांगत जरांगे पाटलांमुळे भाजप सत्तेवर आलेला नाही, असा टोला त्यांनी लगावला आहे. देवेंद्र फडणवीस हे चळवळीतील संघाचे भाजपचे नेते आहेत, असे सांगत फडणवीस हे सत्ता नसतानाही नेते होते आणि सत्ता असतानाही नेतेच आहेत, असा शब्दात त्यांनी जरांगे पाटलांवर पलटवार केला आहे.

## भारतानेही सतर्क राहावे

इस्त्राईल आणि हमास यांच्या युद्धातील नवा अंक आता सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या युद्धात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आणि संपूर्ण जगात तंत्रज्ञानाचा उपयोग आणि दुरुपयोग यावर पुन्हा चर्चा होऊ लागली. दोन दिवसांपूर्वी लेबनॉन मध्ये एकाच वेळी हजारो पेजरचा स्फोट झाला. हा स्फोट ताजा असतानाच त्याच्या दुसऱ्या दिवशी लेबनॉनमध्येच हजारो वकिटॉकीचा स्फोट झाला. या स्फोटात हजारो हिजबुल्ला जखमी झाले तर काहींना जीव गमवावा लागला. जगभर या स्फोटाची चर्चा सुरू झाली. हा स्फोट इस्त्राईलची गुप्तचर संघटना मोसादने घडवून आणला असा आरोप लेबनॉनने केला असून या स्फोटाला लवकरच जशास तसे उत्तर देण्यात येईल अशी घोषणा केली. या स्फोटा नंतर संपूर्ण जगात खळबळ माजली. पेजर सारख्या छोट्या उपकरणाचा संहारक शस्त्र म्हणून वापर करता येऊ शकतो असा विचारच कोणी केला नाही. वास्तविक पेजर हे सध्या कालबाह्य झालेले उपकरण आहे. १९९० साली आलेले हे उपकरण एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वापरले जात असे. अर्थात यात फोन प्रमाणे बोलता येत नाही तर या उपकरणाद्वारे फक्त एकमेकांना छोटे टेक्स्ट मेसेज पाठवता येतात. भारतात हे उपकरण १९९५ साली आले मात्र म्हणावे तसे हे उपकरण यशस्वी ठरले नाही. मोबाईल आल्यानंतर तर त्याचा वापरच संपला असे असतानाही कालबाह्य झालेले हे उपकरण हिजबुल्ला का वापरत होते असा प्रश्न पडला असेल तर त्याचे उत्तर असे आहे की पेजर वापरकर्त्याचे लोकेशन ट्रेस करता येत नाही. केवळ मेसेज पाठवला जात असल्याने मेसेज दोघांशिवाय तीसऱ्याला दिसत नाही म्हणूनच हीजबुल्ला चे कमांडर हे उपकरण वापरत होते. हे उपरकरण सुरक्षित आहे असा त्यांचा समज होता मात्र हा समज तेंव्हा खोटा ठरला जेंव्हा लेबनॉन मध्ये एका पाठोपाठ एक स्फोट झाले. लेबनॉन मध्ये ज्या पेजरचा स्फोट झाला त्या पेजरमध्ये अल्पप्रमाणात पेइटीएन स्फोटकांचा वापर करण्यात आला होता. या पेजरमध्ये ज्या बॅटरया वापरण्यात आल्या होत्या त्या आयात करण्यात आल्या होत्या. याच बॅटर्यांमध्ये हे स्फोटके लपवले होते असे म्हंटले जाते. या स्फोटानंतर जगभर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारतातही आता तसाच प्रश्न विचारला जात आहे कारण भविष्यातील युद्ध हे अशाच तंत्रज्ञानाचा वापर करून लढले जाणार आहे. आज जे तंत्रज्ञान वापरून इस्त्राईलने हा हल्ला केला तेच तंत्रज्ञान जर अतिरेक्यांच्या हातात लागले तर जगभर हाहाकार उडेल. भारतात तर अब्जावधी लोक मोबाईल वापरतात. जगात सर्वात जास्त मोबाईल भारतीय नागरिक वपरतात. आज जर पेजर, वॉकीटॉकीचा वापर बॉम्ब म्हणून केला जातो तर भविष्यात मोबाईलही बॉम्ब होऊ शकतो. भारतात जे मोबाईल वापरण्यात येतात त्याची बॅटरी ही परदेशातून आयात केलेली असते. भारतात वापरण्यात येत असलेल्या ९० टक्के मोबाईलच्या बॅटरया या चीन, तैवान आणि हाँगकाँग येथून आपण आयात करतो केवळ मोबाईल किंवा मोबाईलची बॅटरीच नाही तर दररोज पाच लक्ष इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण परदेशातून आयात करतो. भारतातील संबंधित अथॉरिटी देखील मान्य करेल की देशात आयात होणाऱ्या ९० टक्के उपकरणांची कोणतीही तपासणी होत नाही. यावरून लक्षात येईल की आपल्या देशात किती धोकेदायक परिस्थिती आहे. देशातील प्रत्येक नागरिक आपल्या खिशात एक बॉम्ब घेऊन फिरतोय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मागील काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी पुन्हा सक्रिय झाले आहेत. काश्मीरमध्ये घुसखोरी वाढली आहे. सीमेवर दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. गुप्तचर संस्थांच्या चौकशीतून हे निष्पन्न झाले आहे की अतिरेकी घुसखोरी करताना मोठ्या प्रमाणात मोबाईल पचा वापर करत आहेत. या प चा वापर गिर्यारोहक पर्वतावर, डोंगरावर चडण्यासाठी करतात आता याच पचा वापर करत अतिरेकी घुसखोरी करत आहेत. चीन तर आपला १ नंबर चा शत्रू आहे. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करण्यात चीनचा हातखंडा आहे. उद्या लेबनॉन स्फोटात वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अतिरेक्यांच्या हाताला लागले किंवा चीन सारखा देश त्याचा वापर शस्त्र म्हणून करू लागला तर तर काय होईल याचा विचारही करवत नाही म्हणूनच भारताने याबाबत दक्ष राहायला हवे. भारतात विदेशातून येणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तसेच वस्तूंची १०० टक्के तपासणी व्हायला हवी. मोबाईल, टॅब्लेट, लॅपटॉप, स्मार्ट वॉच यासारख्या गॅझेट वापरा संदर्भात सरकारने गाईड लाईन निश्चित करण्यात करावी. प्रत्येक नागरिकांना या बाबत प्रशिक्षण द्यावे. लेबनॉन मध्ये जे झाले ते भारतात होऊ नये यासाठी सरकारने आतापासूनच दक्ष राहून योग्य ती खबरदारी घ्यावी कारण युद्धाच्या या नव्या प्रकाराचा धोका भारताला अधिक आहे. भारताने लेबनॉन पासून धडा घ्यायला हवा.

# विहिरी, शेततळे, वीज जोडणीसाठी भरीव अनुदान : बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा



बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारून विहिरी, शेततळे, वीज जोडणी आदींसाठी भरीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सुधारित निर्णयानुसार नवीन सिंचन विहिरीस ४ लाखांपर्यंत तर जुन्या विहिरींच्या दुरुस्तीस १ लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. पूर्वी हे अनुदान अनुक्रमे अडीच लाख आणि पन्नास हजार एवढे होते. इनवेल बोअरिंगसाठी आता ४० हजार तसेच यंत्रसामुग्रीसाठी ५० हजार रुपये आणि परसबागेकरिता ५ हजार देण्यात येईल. नवीन विहिरींबाबत १२ मीटर खोलींची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी सध्या १ लाख रुपये अनुदान देण्यात येते आता ते प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा २ लाख यापैकी जे कमी असेल ते देण्यात येईल. त्याच प्रमाणे तुषार सिंचनासाठी सध्या २५ हजार रुपये देण्यात येतात. आता तुषार सिंचन संच ४७ हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के अनुदानापैकी जे कमी असे ते अनुदान देण्यात येईल. अशाच प्रमाणे ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्क्यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येईल.

याशिवाय इतरही अनेक निकषांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत घटकांचे आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे

या योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ व निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण

प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते.इनवेल बोअरिंगसाठी ४० हजार रुपये,वीज जोडणी आकारासाठी २०,००० किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते .विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिनसाठी १० अश्र्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,००० यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईपसाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते .

सूक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी

प्रचलित आर्थिक मापदंडान्वये तुषार सिंचन संच–रू.४७,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडान्वये ठिबक सिंचन संच–रू.९७,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/– यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/– यापैकी जे कमी असेल ते.यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) साठी ५० हजार रुपये. परसबागेसाठी पाच हजार रुपये.

त्याचप्रमाणे या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे.या योजनेंतर्गत यंत्रसामग्री (बैलचलित / ट्रॅक्टरचलित अवजारे) ही नवीन बाब समाविष्ट करण्यात आली आहे.नवीन विहीरीबाबत रू. ४ लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, १२ मीटर खोलीची अट रद्द करण्यात आली आहे.महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ३ नुसार अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या ५०० मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या ५०० मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये, यास मान्यता देण्यात आली आहे. ही योजना अनुसूचित जमातीच्या लाभ धारकांसाठीच राबविण्यात येत असल्याने, दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे.

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थीस २० वर्षानंतर जुनी विहिर दुरुस्ती या घटकाचा लाभ देण्यात यावा. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकासाठी प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्याची तरतूद करावी. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांना देखील देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती किंवा शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देय राहील.

अ) नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ६,४२,०००/ किंवा रु. ६,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर–रु.४,००,०००+ इनवेल बोअरिंग–रु.४०,००० + वीज जोडणी आकार–रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन– रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)– रु.५०,००० + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप– रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री– रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ६,४२,०००/किंवा रु. ६,९२,०००)

आ)जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जूनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु ३,४२,०००/ किंवा रु ३,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जूनी विहीर दुरुस्ती– रु.१,००,०००+ इनवेल बोअरिंग–रु.४०,००० + वीज जोडणी आकार–रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन– रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)– रु.५०,००० + एचडीपीई/पीव्हीसी पाईप– रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री– रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ३,४२,०००/ किंवा रु. ३,९२,०००)

इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ४,०२,०००/ किंवा रु. ४,५२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण – रु.२,००,००० + वीज जोडणी आकार–रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन– रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)– रु.५०,००० + एचडीपीई/पीव्हीसी पाईप– रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री– रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ४,०२,०००/ किंवा रु. ४,५२,०००).

पान १ वरून...

## मंत्रालयातील 'मुख्यमंत्री वॉर रूम'

* एक्झिक्यूटिव्ह, सेक्टरल आणि प्रोजेक्ट डॅशबोर्डची निर्मिती, या डॅशबोर्डच्या माध्यमातून प्रकल्पाच्या प्रत्येक क्षेत्रातील कामाचे मूल्यमापन.

* प्रकल्पाला गती मिळण्यासाठी त्यामधील प्रश्न सोडविण्याकरिता सबंधित विभागाला नोटिफिकेशन आणि अलर्ट देण्याची सुविधा.

* प्रकल्पामधील अडचणी दूर करण्यासाठी ' रियल टाईम मॉनिटरिंग' व्यवस्था.

* प्रकल्पाच्या प्रगतीमध्ये अडथळा ठरणारे प्रश्न सोडविण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय व ट्रॅकिंग यंत्रणेचा विकास.

थोडक्यात वॉर रूम बाबत..

*कॉर्पोरेट क्षेत्रातील कार्यालयासारखी अंतर्गत रचना व रंगसंगती.

*राज्यात सुरु असलेल्या पायाभूत सोयी सुविधांचे प्रतिबिंब दाखविणारे दर्शनी भागात असणारे आकर्षक भित्तीचित्र

*विविध अँगलमधून सादरीकरण बघणे सहज व्हावे, यासाठी एलईडी स्क्रीन.

*सध्या सुमारे ७० पायाभूत प्रकल्प डॅशबोर्डवर आहेत. ज्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख कोटी रुपये असून हे प्रकल्प १५ क्षेत्रांमधील आहे.

*सीएम वॉर रूमला आजपर्यंत विविध प्रकल्पांशी संबंधित सुमारे ३५० समस्या प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १६५ समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे.

*प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी सुमारे २०० हून अधिक बैठका आयोजित केल्या आहेत.

## चाईल्ड पॉर्नोग्राफी पाहिल्यास

मिळवून देण्यासाठी समाजाची जबाबदारी या संदर्भात सर्वोच्च न्यायाल्याने मार्गदर्शन केले.

त्याचसोबत, खंडपीठाने चाइल्ड पोर्नोग्राफी आणि त्याचे कायदेशीर परिणाम याबाबतची मार्गदर्शकतत्त्वे सुद्धा जारी केली. सर्वोच्च न्यायाल्याने आपल्या निवेदनात म्हटले पोक्सो कायद्यात दुरुस्ती करण्यात यावी, असे आम्ही संसदेला सुचवले आहे. त्याच सोबत, Child Pornography EodOr child sexual exploitative and abuse material(CSEAM) ही संज्ञा वापरात यावी यासाठी अध्यादेश काढण्यात यावा असे सुद्धा सांगितले.

सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या मते, हा निकाल अत्यंत महत्वाचा असून, जगाच्या पाठीवर पहिल्यांदाच अल्पवयीन मुलामुलींच्या लैंगिक शोषणाबद्दल न्यायपालिकेत इतका सविस्तर विचार होतो आहे. मद्रास उच्च न्यायाल्याने या संदर्भात, एका २८ वर्षीय तरुणाला जामीन मंजूर केला होता. सदर युवक आपल्या फोन मध्ये लहान मुलांचे लैंगीक शोषण करणारी चित्रफित बघत होता, ज्यामुळे त्याला अटक करण्यात आली होती. मद्रास उच्च न्यायाल्याने आपल्या निकालात म्हटले की या संदर्भात, आयटी कायद्याच्या अंतर्गत तरुणाला अटक करण्यात येऊ शकत नाही.

मात्र, मद्रास उच्च न्यायाल्याच्या या निकालाला आव्हान देत, सिनियर ॲडव्होकेट एचएस फुलका यांनी सर्वोच्च न्यायाल्यात धाव घेतली.आपल्या निकालात, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की निकाल देताना मद्रास उच्च न्यायालयाने गंभीर चूक केली आहे. त्याच सोबत सदर आरोपीच्या विरुद्ध पुन्हा एकदा कारवाई सुरु करण्यात यावी अशी सूचना सुद्धा करण्यात आली आहे.

काय होणार शिक्षा?

२०१२ सालच्या पोक्सो कायद्याच्या कलम १४ अंतर्गत, अल्पवयीन मुलांचा वापर अश्र्लील चित्रफित केल्यात किमान ५ वर्षांचा तुरुंगवास, आणि ५००० रुपयांचा दंड ठोठावण्यात येईल. अठरा वर्षाखालील व्यक्तीला कुठल्याही पद्धतीचे अश्र्लील चित्र, लेखन, पुस्तक, पत्रिका दाखवणे कायदेशीर गुन्हा आहे. एखादी व्यक्ती दोषी आढळल्यास, त्याला/तिला ७ वर्षांपर्यंत कारावास आणि ५००० रुपयांच्या दंडासह शिक्षा होऊ शकते.

# आता स्विगीमधून कमाई करणार माधुरी दीक्षित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : ऑनलाइन फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म स्विगीच्या आयपीओबाबत बाजारात खळबळ उडाली आहे. कंपनी या वर्षी डिसेंबरपर्यंत आपला खझज बाजारात आणू शकते. मिळालेल्या माहितीनुसार, डुळससू च्या खझज ची किंमत सुमारे ११,००० कोटी रुपये आहे आणि खझज नंतर कंपनीचे मूल्यांकन १.२५ लाख कोटी रुपये होण्याची अपेक्षा आहे. कंपनीच्या आयपीओच्या बातम्यांदरम्यान आता माधुरी दीक्षितचेही मन कंपनीकडे आकर्षित झाले आहे. आयपीओ येण्याआधीच तिने स्विगीवर मोठी बाजी खेळली आहे.

याआधी अमिताभ बच्चन आणि मोतीलाल ओसवाल, फायनान्शियल सर्व्हिसेसचे चेअरमन रामदेव अग्रवाल यांनीही स्विगीचे करोडो रुपयांचे शेअर्स खरेदी केल्याचा दावा केला जात आहे.

सूत्रांच्या हवाल्याने मनी कंट्रोलने आपल्या अहवालात दावा केला आहे की माधुरी दीक्षितने ३४५ रुपये प्रति शेअर दराने हा करार केला आहे. बॉलीवूडची सुपरस्टार माधुरी दीक्षितने Innov8 चे संस्थापक रितेश मलिक यांच्यासोबत हा करार केला आहे, Innov8 ही एक को–वर्किंग स्पेस कंपनी आहे, जी नंतर जू ने विकत घेतली. माधुरी दीक्षित आणि रितेश मलिक यांनी सुमारे ३ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. या दोघांनी प्रत्येकी दीड कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

दोघेही सहसा डॉ. श्रीराम नेने यांच्यासोबत एकत्र गुंतवणूक करतात. स्विगीच्या इन्व्हेस्टमेंट बँकर अवेंडसच्या मदतीने त्याने हा व्यवहार केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. जेव्हा दुय्यम व्यवहार होतो, तेव्हा एखाद्या कंपनीच्या विद्यमान गुंतवणूकदाराला त्याचे शेअर्स विकायचे असतात. या करारात कंपनीची कोणतीही भूमिका नाही.

# व्हॉईस ऑफ मिडीयाच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल म्हस्के तर सरचिटणीस पदी दिगंबर महाले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : जागतिक पातळीवर ४३ देशात पत्रकार आणि पत्रकारांसाठी काम करणाऱ्या ३ लाख ९० हजार सदस्य संख्या असणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडीयाची महाराष्ट्र राज्य पदाधिकारी निवड प्रक्रिया निवडणुकीच्या द्वारे नुकतीच पार पडली. या निवड प्रक्रियेमध्ये बुलढाण्याचे अनिल मस्के यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडणुकीच्या माध्यमातून निवड झाली. तर जळगावचे दिगंबर महाले यांची सरचिटणीस म्हणून वर्णी लागली. कार्याध्यक्षपदी नंदुरबारचे योगेंद्र दोरकर, परभणीचे विजय चोरडिया आणि चंद्रपूरचे मंगेश खाटीक, उपाध्यक्ष म्हणून सोलापूरचे अजित कुंकुलोळ यांना प्रचंड मताधिक्य मिळवून त्यांची निवड झाली.

गेल्या एक महिन्यापासून व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. या निवडणुकीमुळे राज्याची संपूर्ण कार्यकारणी बरखास्त झाली होती. व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी भारतामधल्या संपूर्ण राज्याच्या निवडणुका होणार असे जाहीर केले होते. महाराष्ट्राम ध्ये सुद्धा हा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. संजीवकुमार कलकुरी आणि सीए सुरेश शेळके या दोघांनी महाराष्ट्राच्या निवडणुकीमध्ये निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. राज्यभरातल्या प्रमुख तीनशे व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदार म्हणून आपली भूमिका बजावली. या निवडणुकीत एकूण ९२ टक्के मतदान झालं. गेल्या तीन वर्षापासून उत्कृष्ट काम करणाऱ्या अनिल म्हस्के यांना प्रथम क्रमांकाचे मतदान देऊन त्यांची पुन्हा प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडणुकीच्या माध्यमातून निवड झाली. प्रथम क्रमांकाचे मतदान, द्वितीय क्रमांकाचे म तदान असे एकूण १३ क्रमांक १३ उमेदवारासाठी दिले होते. पहिल्या पसंतीच्या मतदानाला प्रदेशाध्यक्ष आणि मग इतर पसंती त्या त्या पदाप्रमाणे दिली होती. निवडणुकीच्या माध्यमातून जे पदाधिकारी विजय झालेले आहेत, त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या पदांचा पदभार आला आहे.

प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, प्रदेश सरचिटणीस दिगंबर महाले, कार्याध्यक्ष, मुख्य संयोजक, तथा प्रशासकीय प्रमुख योगेंद्र दोरकर, कार्याध्यक्ष संघटन म राठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई आणि कोकण विजय चोरडिया, कार्याध्यक्ष संघटन विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र मंगेश खाटीक, उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ, उपाध्यक्ष संजय पडोळे, कोकण आणि मुंबई विभागीय अध्यक्ष अरुण ठोंबरे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मिलिंद टोके, विदर्भ अध्यक्ष किशोर कारंजेकर,म राठवाडा अध्यक्ष सतीश रेंगे पाटील, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन मोहिते, राज्य कार्यवाहक म्हणून अमर चोंदे यांची निवडणुकीच्या माध्यमातून निवड झाली आहे. उर्वरीत आठ जणांची राज्य कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष लवकरच घोषीत करणार आहेत. येत्या २९ सप्टेंबरला मुंबईच्या प्रेस क्लब येथे सकाळी अकरा वाजता मान्यवर व्यक्तीच्या हस्ते या सर्व पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा, सत्कार सोहळा आयोजित करण्यात आल्या असल्याची माहिती प्रदेश सरचिटणीस दिगंबर महाले यांनी दिली आहे.

मी गेली तीन वर्ष पत्रकारांसाठी मेहनतीने काम करत होतो ती मेहनत यानिमित्ताने कामाला आली. मला पुन्हा संपूर्ण पत्रकारांनी राज्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी दिली. त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो, अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झालेले अनिल म्हस्के यांनी दिली. आज पासून संपूर्ण जिल्हा कार्यकारणी बरखास्त करण्यात येत आहे. येत्या एक ऑक्टोबर पासून नवीन जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष यांची निवडणुकीच्या माध्यमातून निवड प्रक्रिया सुरू होईल. अशी माहिती यावेळी अनिल म्हस्के यांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यातील सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ

## मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : . राज्य मंत्रिमंडळाच्या सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले आहेत.यामध्ये राज्यातील सरपंच व उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सरपंच व उपसरपंचाना एक प्रकारे दिवाळीचे बोनस मिळाले असल्याची चर्चा राज्यात होऊ लागली आहे.

सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसचे बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना



आश्वासित प्रगती योजना, शिक्षकांना वरिष्ठ निवड श्रेणी चा निर्णय घेतला आहे. तसेच धान उत्पादकांना दिलासा देत आता प्रतिक्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर देण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जुन्नर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गासाठी १४८६ कोटीचा प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे.

करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. यवतमाळ, जळगांव जिल्ह्यातील सूतगिरणींना थकबाकी परतफेडीसाठी हप्ते देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना सूसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी वांद्रेतला भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून ग्रामपंचायत अधिकारी पदास मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दूप्पट वाढ करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रेतील नव्या संकुलाचे बांधकाम राज्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे.हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्वावर विकसित करण्याचा निर्ण्य घेण्यात आला असून साठ वर्षाचा भाडेपट्टा करार करण्यात येणार आहे.

ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विधी विद्यापीठांना सात कोटी रूपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.तसेच अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याच्या निर्णयात सुधारणा व जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याचा, श्रीरामपूर तालुक्यातील मौजे हरेगाव येथील शेती महामंडळाच्या जमिनी मुळ मालकांना परत करण्याचा निर्ण्य, दूध अनुदान योजना सुरु ठेवण्याचा व उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान देण्याचा निर्ण्य घेण्यात आला आहे.व महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात आले आहे.

## संक्षिप्त...


### आमदार गोपीचंद पडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : धनगर समाजाला एस. टी. प्रवर्गातून आरक्षण मिळण्यासाठी गेल्या चौदा दिवसांपासून पंढरपुरात धनगर समाजबांधव उपोषणास बसले आहेत. त्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि आरक्षण मिळण्याच्या मागणीकरीता कोल्हापुरातील धनगर समाज आक्रमक झाला आहे. याच पार्श्र्वभूमीवर कोल्हापूरच्या प्रवेशद्वारावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. भाजपचे विधानपरिषद आमदार गोपीचंद पडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले. यासोबतच जिल्ह्यातील धनगर समाजाचे नेते बबनराव रानगे, अशोक कोळेकर यांच्यासह मोठ्या संख्येने धनगर समाज बांधव उपस्थित होते. धनगरी ढोल बडवत काहीजण या आंदोलनात सहभागी झाले होते.

### हातावर काळ्या फिती बांधत परिवहन विभागातील कामगारांचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र कर्मचारी युनियन तर्फे परिवहन विभागातील रोजंदारी व ठोक मानधनावरील कामगारांना कायम करणे, कामगारांची पगार वाढ करणे तसेच कामगारांना आरोग्य सुविधा देणे या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन पुकारण्यात आलेय. परिवहन विभागातील कामगारांनी हातावर काळ्या फिती बांधत नवी मुंबई मनपा प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. यावेळी तुर्भे आगारात जोरदार घोषणाबाजी करत मागण्या मान्य न केल्यास काम बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

### भिवंडीत श्रमजीवी संघटनेचे पंचायत समिती समोर बेमुदत धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : देशाला स्वतंत्र मिळून ७७ वर्षे झाले तरी आज ही ठाणे जिल्ह्यात पिढ्यां न पिढ्या वास्तव्यास असलेल्या आदिवासी व आदिम कातकरी जमातीचे मुलभूत हक्कांचे प्रश्न प्रलंबित आहेत. रोजगार,पिण्याचे पाणी,गावठाण,घराखालील जागा,जातीचा दाखला,रेशनिंग,शिक्षण, आरोग्य तसेच अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वनहक्काचे तालुक्यातील ३७४ दावे प्रलंबित असून,तसेच गावठाण निर्माण करण्याबाबत शासन निर्णय झालेला असताना त्याची अंमलबजावणी केली जात नसल्याने भिवंडी पंचायत समिती कार्यालया बाहेर श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

### 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेचा तिसरा हप्ता २९ सप्टेंबरपासून मिळणार – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महिलांना आर्थिक सक्षम बनवणारी मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या हप्त्याचे पैसे लाभार्थ्यांना दि. २९ सप्टेंबर पासून डीबीटी द्वारे हस्तांतरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



आज मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेची आढावा बैठक आज मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती.

दि.२९ सप्टेंबर २०२४ रोजी रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात मुख्यमंत्री – माझी लाडकी बहिण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजन संदर्भात आढावा घेण्यात आला.

व्यासपीठाचे व्यवस्थापन, कायदा व सुरक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यक्रमस्थळी पार्किंगची व्यवस्था, पिण्याचे पाणी, लाभार्थ्यांची यशोगाथा याबाबतच्या महत्वाच्या सूचना मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

### मनोज जरांगे यांची तब्येत खालावली; उपोषणाचा सातवा दिवस, भोवळ येऊन पडल्याचा कार्यकर्तांचा दावा

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मराठा आरक्षणासाठी आंदोलक मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. रविवारी मध्यरात्री मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली. त्यांना भोवळ आल्याचा दावा त्यांच्या समर्थकांनी केला. त्यामुळे मनोज जरांगे यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी वैद्यकीय पथक आंदोलनस्थळी दाखल झालं. मनोज जरांगे यांना तातडीनं उपचार घेणं गरजेचं आहे, असं यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितल्याचा दावाही मनोज जरांगे यांच्या समर्थकांनी केला.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्कार वितरण सोहळा

## गाव आणि मन कायम स्वच्छ ठेवा – पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर, /प्रतिनिधी** : स्वच्छता व त्यामाध्यमातून लोकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरु करण्यात आले. स्पर्धेमुळे गावा गावांत स्वच्छतेसाठी चढाओढ लागली, ही एक चांगली बाब आहे. मात्र केवळ स्पर्धेपुरते गाव स्वच्छ ठेवू नका. गाव आणि मन स्वच्छ ठेवण्याचा कायम प्रयत्न करा, त्यातच आपली प्रगती आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे केले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आज येथील संत एकनाथ रंगमंदिरात पार पडला. सन २०१८-१९, २०२९-२०, २०२०-२१, २०२१-२२ अशा एकत्रित स्पर्धांचे आज पुरस्कार वितरण मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

अध्यक्षस्थानी अल्पसंख्याक विकास, औकाफ व पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार हे होते. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, अभियान संचालक ई. रविंद्रन, अतिरिक्त संचालक शेखर रौंदळ, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना आदी मान्यवर सोहळ्यास उपस्थित होते.

आपल्या संबोधनात श्री. पाटील म्हणाले की, गावाला मिळणारा पुरस्कार हा गावाचे वैभव असतो. आपलं गाव स्वच्छ असावं असे तरुणांना वाटते हे या अभियानाचे यश आहे. गाव स्वच्छ तर मन स्वच्छ. सर्व गावाने मिळून एकोप्याने काम केलं तर नक्कीच गावाची प्रगती होऊ शकते. त्यासाठी गावकऱ्यांनीही आपले सर्व कर नियमित भरणे आवश्यक असते. तसे केले तरच ग्रामपंचायतीकडून लोकांना सेवा दिली जाऊ शकते. ही स्पर्धा तांड्या- वाड्यांपर्यंत नेण्यासाठी तसेच स्पर्धेतील पारितोषिकाची रक्कम वाढविणे ही बाबही शासनाच्या विचाराधीन आहे,असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले की, स्पर्धा निर्माण करुन गावांचा विकास करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यात सर्व गावाने एकोप्याने सहभागी होणे आवश्यक आहे.

प्रास्ताविक अभियान संचालक ई रविंद्रन यांनी केले. अभियानाबाबत विभागाची भुमिका प्रधान सचिव संजय खंदारे यांनी मांडली. विजय कदम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला राज्यभरातील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींचे सरपंच उपस्थित होते.

# सरपंचाची स्थानिक पत्रकारांना धमकी; पत्रकार अनिल भगत यांच्या तक्रारीवरून सरपंच अंबडकार यांचे विरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव (जामोद)/ प्रतिनिधी** : सुनगांव गावात घानीचे साम्राज्य. नळाद्वारे गलिच्छ ,गढूळ पाणी नागरिकांना पिण्यासाठी देण्यात येते. ग्रामपंचायतचे कसलेही नियंत्रण नसून ग्रामसेवकाची भूमिका सामंज्याशाची असली तरी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यामध्ये टाळा मेळ नाही. एकाच महिन्यात दोन वेळा महिलांनी ग्रामपंचायतवर घागर मोर्चा आणून सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्याला धारेवर धरले होते. आपल्या गावावर गोमाल सारखी परिस्थिती येऊ नये म्हणून ग्रामपंचायत प्रशासनाला सावध करण्याचे वृत्त प्रकाशित केल्याबद्दल पत्रकार अनिल भगत यांना सरपंच रामेश्र्वर अंबडकर यांनी दिनांक २१ सप्टेंबर रोजी धमकी दिली. पत्रकार अनिल भगत हे आर सी २४ न्युज चे बुलढाणा जिल्हा विशेष प्रतिनिधी व दैनिक महासागराचे तालुका प्रतिनिधी तथा व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका सचिव आहेत .गावामध्ये तीर्थक्षेत्र विकास कामा अंतर्गत रस्त्याचे काम सुरू आहे. सदर कंत्राट दराने ग्रामपंचायतला विश्र्वासात न घेता काम सुरू केले. काम कोणत्या विभागाचे आहे हे ग्रामपंचायतला ज्ञात नाही. ठरावाप्रमाणे काम होते की नाही हे पण ज्ञात नाही. त्या कंत्राटदाराने रस्ता खोदकाम करताना पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन फोडली. त्या पाईप लाईन मधून गटाराचे अशुद्ध पाणी नळाद्वारे येत असल्याचे दिसते. सध्या ताप ,खोकला आणि साथीचे रोग सुरू आहेत. गोमाल मुळे सर्व भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे प्रशासनाने संबंधित ग्रामपंचायतवर कार्यवाही करणे अपेक्षित आहे.परंतु सरपंच अंबळकार हे मात्र मनमानी कारभार करीत आहेत. स्थानिक पत्रकार अनिल भगत यांना त्यांनी अर्वाच्य भाषेत दमदाटी केली असून त्यामुळे पत्रकारांमध्ये सुद्धा सरपंचा विषयी असंतोषाचे वातावरण आहे.सरपंचावर गुन्हा दाखल: सुनगाव गावामध्ये घाणीचे साम्राज्य असून गावामध्ये साथीचे रोग पसरण्याची शक्यता आहे सारखी परिस्थिती उद्भवू शकते .अशा आशयाचे वृत्त स्थानिक पत्रकार अनिल भगत यांनी प्रकाशित केल्याबद्दल सरपंच रामेश्र्वर अंबडकार यांनी दिनांक २१ सप्टेंबर रोजी संबंधित पत्रकार मारण्याची धमकी दिली. आपण स्वतः आपल्या विधवा आई सोबत एकटेच राहतो. सरपंच अंबळकार यांच्या धमकीमुळे आपण भयभीत झालो आहोत. आपल्याला ते कधी मारू शकतात. माझ्या जीवितास काही बरेच वाईट झाल्यास त्यात सर्वस्वी जबाबदार सरपंच रामेश्र्वर अंबळकार राहतील, अशा आशयाची तक्रार व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका सचिव अनिल भगत यांनी पोलीस स्टेशनला दिल्यानंतर भारतीय न्याय समितीच्या २०२३ नुसार ३५२(२) नुसार संबंधितावर गुन्हा दाखल झाला आहे. सुनगाव मध्ये सहा ते सात पत्रकार असून सर्व पत्रकारांशी सरपंच अंबळकार यांची वागणूक ही धमकीखोरपणाचीच असते. त्यामुळे प्रकरणाची सत्यता तपासणी करून अंबळकार यांच्यावर कठोर कारवाई करावी, पत्रकार संरक्षण कायद्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा,अशा आशियाची मागणी व्हॉइस मीडियाचे तालुकाध्यक्ष गुलाबराव इंगळे यांचे सह तालुक्यातील सर्व पत्रकारांनी केली आहे.

### आरक्षणाला पाठिंबा, जरांगेंची मागणी देखील योग्य पण.., पवार स्पष्टच बोलले

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न चांगलाच तापला आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं या आपल्या मागणीसाठी उपोषणाला बसले आहेत, त्यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. यावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# जरांगे पाटील यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे सरकारला महागात पडेल- मराठा क्रांती मोर्चा

## पिंपरीत मराठा क्रांती मोर्चाचे धरणे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी/प्रतिनिधी** : मराठा समाजाच्या आरक्षण व इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत गेल्या वर्षभरापासून महाराष्ट्र सरकारने जरांगे पाटील यांना विविध आश्र्वासने दिली आहेत परंतु त्याची अंमलबजावणी करण्यास सरकार टाळाटाळ करत आहे. यामुळे राज्यभरातील मराठा समाज प्रचंड चिडलेला आहे त्यामुळे सोमवार दिनांक २३ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र आले.

सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात आत्मक्लेश व धरणे आंदोलन केले. संतप्त कार्यकर्त्यांनी यावेळी सरकारचा निषेध केला तसेच जरांगे पाटील यांना दिलेला शब्द सरकारने पाळावा सर्व मागण्या तात्काळ




मान्य कराव्यात आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे राज्य सरकारला महागात पडेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून सकाळी अकरा वाजता धरणे आंदोलन सुरू करण्यात आले मराठा समाजाचा सरसकट ओबीसी प्रवर्गात समावेश करावा. सगे सोयरे अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे. हैदराबाद गॅजेट,सातारा गॅजेट, बॉम्बे गॅजेट लागू करावे मराठा आंदोलकां वरील दाखल सर्व गुन्हे सरकारने मागे घ्यावेत जरांगे पाटील यांना दिलेल्या सर्व आश्र्वासनांची ताबडतोब अंमलबजावणी करावी मराठा समाजाची फसवणूक करू नये अशा मागण्या आंदोलकांच्या वतीने करण्यात आल्या मागण्या मान्य न करता मनोज जारंगे पाटील यांच्या आमरण उपोषणाकडे दुर्लक्ष केल्यास यापुढे पिंपरी चिंचवड शहरात आंदोलन आणखी तीव्र करणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने यावेळी जाहीर करण्यात आले. सायंकाळी पाच वाजता राष्ट्रगीत म्हणून आत्मक्लेश व धरणे आंदोलनाची सांगता करण्यात आली.

## विविध वृत्त...

### देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील दोन मोठे पक्ष फोडल्याच केलेला काम हे त्यांना भरावा लागेल- जयंत पाटील



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : संजय राऊत यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे हे अजित पवारांना दूर लोटण्याचं काम करत असल्याचं वक्तव्य केल्यानंतर याबाबत बोलताना जयंत पाटील म्हणाले की त्यांना विधानसभेच्या निवडणुका एक संघ राहून लढवाव्या लागतील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील दोन मोठे पक्ष फोडल्याच केलेला काम हे त्यांना भरावा लागेल.. जर त्यांनी अजित पवारांना दूर लोटण्याचं काम केलं तर ही महाराष्ट्राच्या जनतेच्या डोळ्यात धुळ फेक करण्यासाठी केलेलं नाटक असेल अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी व्यक्त केली आहे.

### आपले सरकार पोर्टल प्रभावीपणे राबविण्याबाबत प्रशिक्षण




दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : जिल्ह्यामध्ये आपले सरकार पोर्टलची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, पोर्टलवरील प्रलंबित तक्रारींचा शंभर टक्के निपटारा व्हावा यासाठी राज्य शानाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण सत्राचे विशेष संबोधक मुख्य सचिव ऑनलाईन व्हीसीद्वारे सहभागी झाले होते. प्रशिक्षण सत्रात ई–गर्व्हनन्स तज्ञ देवांग दवे व तांत्रिक सहाय्यक विनोद वर्मा यांनी सहभागी कर्मचाऱ्यांना या संदर्भात प्रशिक्षण दिले. सदर विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन दि.११ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते २ या कालावधीत शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन सभागृहात पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यासह सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

### कर्जत जामखेडमध्ये यावेळी भाजपा परिवर्तन घडविणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आणि कर्जत जामखेड जागेवर परिवर्तन होऊन भारतीय जनता पार्टीचा उमेदवार निवडून येणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे कर्जत जामखेड विधानसभा प्रमुख आणि नगर जिल्हा परिषद माजी सदस्य मधुकर राळेभात, उबाठा शिवसेनेचे जाम खेड तालुका अध्यक्ष संजय काशीद यांनी अनेक कार्यकर्त्यांसोबत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेश कार्यक्रमाम ध्ये श्री. फडणवीस बोलत होते. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री आणि नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आणि आमदार राम शिंदे,आ. सुरेश धस, आ. अतुल भातखळकर आदी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष श्री.बावनकुळे यांनी श्री.राळेभात, श्री. काशीद आणि त्यांच्यासोबतच्या कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले.

श्री. राळेभात यांचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कर्जत,जामखेड मध्ये ज्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस रुजवली असे ज्येष्ठ नेते मधुकर राळेभात यांच्या प्रवेशाम ुळे भाजपाची ताकद वाढणार आहे. भाजपाच्या परिवारात आपण एकजुटीने काम करू अशी ग्वाहीही त्यांनी नव्याने प्रवेश करणाऱ्या सर्वांना दिली. कुकडीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न महायुती सरकारने केल्याचे नमूद करत श्री. फडणवीस म्हणाले की पश्चिम वाहिनी नद्यांचे वाहून जाणारे ५५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी कॅबिनेटने मान्यता दिली आहे. याच्या कामाचे पहिले टेंडरही निघाले असून संपूर्ण जिल्हा जलमय करण्यासाठी महायुती सरकार वेगाने काम करत आहे. महायुती सरकारने शेतकरी हितार्थ घेतलेल्या निर्णयांचा ही त्यांनी उल्लेख केला.

यावेळी श्री. राळेभात म्हणाले की, मागच्या निवडणुकीत रोहित पवार यांना निवडून आणण्यासाठी आम्ही जीवाचे रान केले.कुकडीच्या पाण्यासह अनेक समस्या सोडवण्याची त्यावेळी केवळ आश्वासने दिली गेली मात्र पाच वर्षात काहीच काम केले नाही. जाती जातीत दरी निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले. कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्यात आले . त्यामुळे व्यथित होऊन आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून कर्जत जामखेडच्या विकासासाठी भाजपा मध्ये येण्याचा निर्णय घेतला असेही श्री. राळेभात यांनी सांगितले. भाजपा नेतृत्व जे काम सांगेल ते करू, पक्षातर्फे जो उमेदवार दिला जाईल त्याच्या पाठीशी उभे राहू असेही त्यांनी स्पष्ट केले.श्री. राळेभात यांच्या सोबत कर्जत – जामखेड तालुक्यातील अनेक सरपंच, नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी ही भाजपामध्ये प्रवेश केला.

# आरक्षणाच्या मागणीसाठी डोणगाव येथे धनगर समाजाचे आंदोलन

## पंढरपूर येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा : यळकोट यळकोट जय मल्हारच्या घोषणांनी दणाला परिसर

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : धनगर आरक्षण संदर्भात पंढरपूर येथे सुरु असलेल्या धनगर बांधवांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सोमवारी दि.२३ सप्टेंबर रोजी डोणगाव येथील आरेगाव फाटा येथे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रास्तारोको आंदोलन केले.यावेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना स्थानबद्ध करून वाहतुक सुरळीत केली, नंतर आंदोलकांना सोडून देण्यात आले.

महाराष्ट्रामध्ये धनगर समाज हा अतिशय गरीब असून मेंढपाळ व्यवसाय करून आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.घटनेनुसार धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे.

मात्र सरकारकडून त्याची अंमलबजावणी होत नाही.त्यामुळे धनगर समाजाला आरक्षण देण्यात यावे, यासाठी लोकशाही मार्गाने व शांततेने गेल्या अनेक वर्षापासून आंदोलने करून व निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.मात्र सरकार गंभीरतेने घेत नसून धनगर आरक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे धनगर समाज बांधवांचे मुले मुली विविध योजनेपासून वंचित राहत असून समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी पंढरपूर येथे उपोषण करण्यात येत आहे.

या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सोमवार दि. २३ सप्टेंबर रोजी डोणगाव येथील आरेगाव फाटा येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत. यावेळी यळकोट यळकोट जय मल्हार, धनगर एकजुटीचा विजय असो अश्या अनेक घोषणा देण्यात आल्या. यावेळी पोलिस प्रशासनाने सदर आंदोलकांना




स्थानबध्द करून वाहतूक सुरळीत केली.नंतर आंदोलकांना सोडून देण्यात आले.

# बुलढाणा कृषी विज्ञान केंद्र येथे कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाचे थाटात उद्घाटन

## कृषी विज्ञान या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित उपक्रम






दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : कृषी विज्ञान केंद्र,बुलढाणा येथे देशातील कृषीविज्ञान केंद्रांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्य आयोजित कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाचे (२३ ते २८सप्टेंबर,२०२४) थाटात उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत आज पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून आमदार संजयभाऊ गायकवाड, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, संचालक मनोजकुमार ढगे, जिल्हा संसाधन रवी जाधव, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,कृषी केंद्र अनिल तारू आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अनिल तारू यांनी कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाच्या आयोजनामागील भूमिका आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात व्यक्त केली व कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यप्रणालीबाबत सखोल माहिती उपस्थितांना सांगितली. आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात अन्न प्रक्रिया उद्योगाने समृद्ध अशा फूड पार्कचे महत्त्व विषद केले व शेतकऱ्यांसाठी त्याची उपयुक्तता याविषयी आपले सविस्तर मत मांडले. ते यापुढे म्हणाले की, शाश्र्वत शेतीसाठी शेतकऱ्याचे सहज व सुकरपणे जगणे अत्यंत महत्वाचे आहे. कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाच्या तांत्रिक सत्रात कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणाचे कृषी शास्त्रज्ञ डॉ.नरेंद्रकुमार देशमुख, डॉ.सुकेष्णी वाणे,डॉ.जगदीश वाडकर,डॉ. भारती तिजारे व कृतिका गांगडे यांनी उपस्थितांना आधुनिक शेती,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,तृणधान्य व त्याचे आहारातील महत्व,कृषी अभियांत्रिकेचे शेतीतील महत्व व गरज ई. विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनेश यदुलवार, कृषी हवामान तज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. जगदीश वाडकर, विषय विशेषज्ञ, विस्तार शिक्षण, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले. तसेच शिवाजी पिसे, नितीन काटे, अनिल जाधव, कोकिळा भोपळे, अनुराधा जाधव, रणजीत सदार, नंदकिशोर ढोरे व नयनसिंह चव्हाण कृषी विज्ञान,केंद्र,बुलढाणा आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पंचक्रोशीतील शेतकरी, कृषी पदवीचे विद्यार्थी, कृषी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चांदी व्यापाऱ्याची निर्घृण हत्या करून १५ लाखांचे दागिने लंपास, धाकट्या भावाला पोलिसांनी घेतलं ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसांपासून राज्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचं बघायला मिळतंय. असं असतानाच आता कोल्हापूरमधून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी परिसरात चांदीचा व्यापार करणाऱ्या ३१ वर्षीय व्यावसायिकाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. ब्रह्मनाथ सुकुमार हालोंढे असं या व्यापाऱ्याचं नाव आहे.

## पी एम श्री सावित्रीबाई फुले मनपा शाळेचा द्वितीय क्रमांकाने गौरव

### तालुकास्तरावर २ लक्ष रुपयांचे बक्षीस मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा स्पर्धा




दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान स्पर्धेत पी एम श्री सावित्रीबाई फुले मनपा शाळेस तालुक्यातुन द्वितीय क्रमांकाचे बक्षीस याअंतर्गत २ लक्ष रुपयांचा धनादेश शाळेस प्राप्त होणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान राज्यात राबविण्यात आले. या अभियानात राज्यातील हजारोच्या संख्येने शाळा सहभागी झाल्या होत्या. यामध्ये शासकीय आणि खासगी शाळांचाही समावेश होता. शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा शासनाचा उद्देश होता. या अभियानामध्ये शाळा स्तरावरुन माहिती अंतिम करणे, केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर, महापालिका स्तर, विभाग स्तर, राज्य स्तर यानुसार शाळांचे मूल्यांकन करण्यात आले होते.

विद्यार्थीदशेत शिक्षणासोबत स्वच्छतेची गोडी लागल्यास स्वच्छता ही विद्यार्थ्याच्या आयुष्याचा भाग बनून जाते. शाळा स्वच्छतेच्या कार्यात त्यांना सकारात्मकपणे सहभागी करुन शिक्षण आनंददायी, प्रेरणादायी वातावरण निर्मिती होण्यासह वैयक्तिक स्वच्छतेची सवय जडते. अभियानाचा हाच उद्देश लक्षात घेऊन आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात अतिरीक्त आयुक्त चंदन पाटील,उपायुक्त मंगेश खवले,उपायुक्त रवींद्र भेलावे यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात सावित्रीबाई फुले शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेऊन शाळेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यात यश मिळविले आहे. मिळालेल्या बक्षीस रकमेचा उपयोग शाळेच्या विकासासाठी करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासन अधिकारी नागेश नित यांनी दिली.

# शिंदे गटाचे डिपॉझिट जप्त न केल्यास राजकारणात राहणार नाही - नितीन देशमुख

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : अकोला जिल्ह्यातील बाळापूरचे ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्या एका वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची चिन्ह आहे. कारण, त्यांनी भाजप आणि शिंदे गटाला थेट रावणाची उपमा दिली आहे.तर ते अकोल्यात बाळापुर मतदार संघातील ठाकरे गटाच्या शाखाप्रमुख आणि उपशाखाप्रमुखांच्या मेळाव्यात बोलत होते.तर याच मेळाव्यात त्यांनी बाळापुरातून शिंदे गटाचे डिपॉझिट जप्त न केल्यास राजकारणात राहणार नसल्याचं वक्तव्य केल आहे.



दरम्यान, आमदार नितीन देशमुख यांनी उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीने मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करण्याची मागणी केलीये. नाना पटोलेंना मुख्यमंत्री करण्याची मागणी करणाऱ्या नेत्यांवरही त्यांनी पलटवार केलाय. शिवसेना सोबत असल्यामुळेच काँग्रेस एका खासदारावरून तेरा खासदारांपर्यंत गेल्याचं ते म्हटलेत.

दरम्यान, सुरत आणि गुवाहाटीत शिंदे गटाचा आपला घातपात करण्याचा प्रयत्न होता असा खळबळजनक आरोप त्यांनी पुन्हा एकदा भाषनातून केला आहे. तर हे आपल्या निवडणुकीवर सुरत आणि गुवाहाटीचं लक्ष असल्याचे म्हटलेत.

# दिग्रस येथील बुटले महाविद्यालयात मराठी साहित्योपासक मंडळाचे उद्घाटन थाटात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस येथील बापूरावजी बुटले कला , नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाअंतर्गत कार्यरत मराठी साहित्योपासक मंडळाचे उद्घाटन अमरावती येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. हेमंत खडके यांचे शुभहस्ते नुकतेच संपन्न झाले. दिग्रस विभागीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयकुमार बंग कार्यक्रमाचे अध्यक्ष , तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप मेहता , सचिव श्याम पाटील–महिंद्रे , सचिव डॉ. अभय पाटील , सदस्या मीना पाटील , प्राचार्य डॉ. अरविंद लाडोळे , मोहनाबाई शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता नगराळे आदी उपस्थित होते . मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. रूपेश कऱ्हाडे , डॉ. अपर्णा पाटील व प्रा. निलेश गायकवाड देखील आयोजन प्रमुख म्हणून उपस्थित होते.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रा.डॉ.हेमंत खडके यांनी मराठी साहित्योपासक मंडळाचे फीत कापून उद्घाटन केले . त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात 'मराठी कवितेचे काव्यसौंदर्य ' उलगडून दाखवून अत्यंत मौलिक माहिती दिली. मराठी कवितेतील शब्दांमधून कशी विनोदी अर्थप्रतीती रसिकाला येते, याचे काव्यात्मक सौंदर्य उलगडून दाखवले . नेमका तोच शब्द त्याच ओळीत असल्याशिवाय अर्थसौंदर्य प्रतीत होत नाही. याचे विविध उदाहरण देवून रसिकांना काव्य सौंदर्याची अद्भुत मेजवानी दिली. मराठी साहित्योपासक मंडळाच्या सर्व विद्यार्थी पदाधिकारी व सदस्याचे त्यांनी मनापासून खूप खूप अभिनंदन केले. त्यांच्या साहित्य उपासनेसाठी व पुढील यशस्वी वाटचाली–साठी भरघोस शुभेच्छा दिल्यात.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून विजयकुमार बंग यांनी विद्यार्थ्यांच्या आगामी साहित्यविषयक कार्यासाठी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या मराठी साहित्योपासक मंडळाचे अध्यक्ष कु.श्रुती बेहरे, उपाध्यक्ष पृथ्वीराज कांबळे, गुलशन बिडवाल, सचिव रोहित इंगोले, सहसचिव कु. पौर्णिमा कांबळे, कार्यकारिणी सदस्य, कु.




निकीता कुरकुळे, फैजान चौहान, सोहम गिरे, सौरव शास्त्रकार, कु. रूपाली जयस्वाल, राजेश डाखोरे, कु.जया चिरडे, कु. वैष्णवी मस्के, आर्यन भोरगडे, कु.श्रृती चिरडे, कु.पायल खानझोडे, कु. रक्षा म्हात्रे, कु. साक्षी काळे, कु. दामिनी घाटगे, कु. वैष्णवी जाधव, रोहित इंगळ, कु. नेहा साखरकर, कु. आरती राठोडसारख्या नवीन, उत्साही पदाधिकाऱ्यांना पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रो. डॉ. रूपेश कऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे अत्यंत समर्पक आणि नेटक्या शब्दात दर्जेदार प्रास्ताविक करून उद्घाटक डॉ. खडके यांचा सविस्तर परिचय करून दिला. प्रास्ताविकात डॉ.कऱ्हाडे यांनी इंग्लिश कवी विल्यम वर्डस्वर्थ यांच्या तोडीची संत तुकाराम यांनी कवितेची व्याख्याच 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। धरिता ही परी आवरेना।' या एका अभंगातून व्यक्त केल्याचे रसिकांना पटवून दिले. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन कु. श्रृती बेहरे हिने केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठी भाषा व साहित्य विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच मराठी साहित्योपासक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. सर्व मराठी भाषा व साहित्य प्रेमी बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. आणि एम.ए. (मराठी) चे विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर व ग्रंथालय कर्मचारी यांची देखील बहुसंख्य प्रमाणात उपस्थिती होती.